॥ श्री गणेशाय नमः ॥
गणपतीच्या आरत्या

१. सुखकर्ता दुःखहर्ता

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥

जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रे मनकामना पुरती ॥ धृ ॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।
चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ॥ २ ॥
जय देव जय देव...

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ॥ ३ ॥
जय देव जय देव...

२. शेंदुर लाल चढायो

शेंदुर लाल चढायो अच्छा गजमुखको ।
दोंदिल लाल बिराजे सुत गौरीहरको ।
हाथ लिये गुडलड्डू सांई सुरवरको ।
महिमा कहे न जाय लागत हूं पदको ॥ १ ॥

जय देव जय देव जय जय श्रीगणराज ।
विद्यासुखदाता धन्य तुम्हारा दर्शन मेरा मन रमता ॥ धृ ॥

अष्टौ सिद्धि दासी संकटको बैरी ।
विघ्नविनाशन मंगलमूरत अधिकारी ।
कोटीसूरजप्रकाश ऐसी छबि तेरी ।
गंडस्थलमदमस्तक झूले शशिबिहारी ॥ २ ॥
जय देव जय देव...

भावभगत से कोई शरणागत आवे ।
संतत संपत सबही भरपूर पावे ।
ऐसे तुम महाराज मोको अति भावे ।
गोसावीनंदन निशिदिन गुन गावे ॥ ३ ॥
जय देव जय देव...

॥ श्री गणेशाय नमः ॥
गणपतीच्या आरत्या

३. लवथवती विक्राळा

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
विषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्यसुंदर मस्तकी बाळा ।
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥ १ ॥

जय देव जय देव जय श्रीशंकरा ।
आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ॥ धृ ॥

कर्पूरगौरा भोळा नयनी विशाळा ।
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितिकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ २ ॥
जय देव जय देव...

देवी दैत्य सागरमंथन पै केले ।
त्यामाजी अवचित हळाहळ जे उठिले ।
ते त्वा असुरपणे प्राशन केले ।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झाले ॥ ३ ॥
जय देव जय देव...

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी ।
रघुकुळटिळक रामदासा अंतरी ॥ ४ ॥
जय देव जय देव...

४. दुर्गे दुर्घट भारी

दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी ।
अनाथनाथे अंबे करुणा विस्तारी ।
वारी वारी जन्ममरणांते वारी ।
हारी पडलो आता संकट निवारी ॥ १ ॥

जय देवी जय देवी महिषासुरमथिनी ।
सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ धृ ॥

त्रिभुवनभुवनी पाहता तुजऐसी नाही ।
चारी श्रमले परंतु न बोलवे काही ।
साही विवाद करिता पडिले प्रवाही ।
ते तू भक्तालागी पावसि लवलाही ॥ २ ॥
जय देवी जय देवी...

प्रसन्नवदने प्रसन्न होसी निजदासा ।
क्लेशापासुनि सोडवी तोडी भवपाशा ।
अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा ।
नरहरि तल्लीन झाला पदपंकजलेशा ॥ ३ ॥
जय देवी जय देवी...

॥ श्री गणेशाय नमः ॥
गणपतीच्या आरत्या

५. त्रिगुणात्मक त्रैमूर्ती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।
नेति नेति शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥ १ ॥

जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता ।
आरती ओवाळिता हरली भवचिंता ॥ धृ ॥

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैची कळेल ही मात ।
पराही परतली तेथे कैचा हेत ।
जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ २ ॥
जय देव जय देव...

दत्त येऊनिया उभा ठाकला ।
सद्भावे साष्टांगे प्रणिपात केला ।
प्रसन्न होऊनि आशीर्वाद दिधला ।
जन्ममरणाचा फेरा चुकविला ॥ ३ ॥
जय देव जय देव...

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।
हरपले मन झाले उन्मन ।
मीतूपणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्रीदत्तध्यान ॥ ४ ॥
जय देव जय देव...

६. येई हो विठ्ठले

येई हो विठ्ठले माझे माउली ये ।
निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहे ॥ धृ ॥

आलिया गेलिया हाती धाडी निरोप ।
पंढरपुरी आहे माझा मायबाप ॥ १ ॥
येई हो विठ्ठले...

पिवळा पीतांबर कैसा गगनी झळकला ।
गरुडावरी बैसोनि माझा कैवारी आला ॥ २ ॥
येई हो विठ्ठले...

विठोबाचे राज्य आम्हां नित्य दीपवाळी ।
विष्णुदास नामा जीवेभावे ओवाळी ॥ ३ ॥
येई हो विठ्ठले...

॥ श्री गणेशाय नमः ॥
गणपतीच्या आरत्या

७. आरती ज्ञानराजा

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ धृ ॥

लोपले ज्ञान जगी । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविले ज्ञानी ॥ १ ॥
आरती ज्ञानराजा...

कनकाचे ताट करी । उभ्या गोपिका नारी ।
नारद तुंबरहो । सामगायन करी ॥ २ ॥
आरती ज्ञानराजा...

प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले ।
रामा जनार्दनी । पायी टकचि ठेले ॥ ३ ॥
आरती ज्ञानराजा...

आरती तुकारामा

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरुधामा ।
सच्चिदानंदमूर्ती । पाय दाखवी आम्हां ॥ धृ ॥

राघवे सागरात । पाषाण तारियेले ।
तैसे हे तुकोबाचे । अभंग उदकी रक्षिले ॥ १ ॥
आरती तुकारामा...

तुकिता तुलनेसी । ब्रह्म तुकासी आले ।
म्हणोनि रामेश्वरे । चरणी मस्तक ठेविले ॥ २ ॥
आरती तुकारामा...

८. युगे अठ्ठावीस विटेवरी उभा

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।
वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।
पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा ।
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥

जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावे
जिवलगा ॥ धृ ॥

तुळसीमाळा गळा कर ठेवुनी कटी ।
कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी ।
गरुड हनुमंत पुढे उभे राहती ॥ २ ॥
जय देव जय देव...

धन्य वेणुनाद अणुक्षेत्रपाळा ।
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राही रखुमाबाई राणीया सकळा ।
ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥ ३ ॥
जय देव जय देव...

ओवाळू आरत्या कुरवंड्या येती ।
चंद्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिंड्या पताका वैष्णव नाचती ।
पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥
जय देव जय देव...

आषाढी कार्तिकी भक्तजन येती ।
चंद्रभागेमध्ये स्नाने जे करिती ।
दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ती ।
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥ ५ ॥
जय देव जय देव...

॥ श्री गणेशाय नमः ॥
गणपतीच्या आरत्या

९. घालीन लोटांगण

घालीन लोटांगण वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ।
प्रेमें आलिंगीन आनंदे पूजीन ।
भावें ओवाळीन म्हणे नामा ॥ १ ॥

त्वमेव माता च पिता त्वमेव ।
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव ॥ २ ॥

कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा ।
बुद्ध्यात्मना वा प्रकृतिस्वभावात् ।
करोमि यद्यत् सकलं परस्मै ।
नारायणायेति समर्पयामि ॥ ३ ॥

अच्युतं केशवं रामनारायणं ।
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम् ।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं ।
जानकीनायकं रामचन्द्रं भजे ॥ ४ ॥

हरे राम हरे राम राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे ॥ ५ ॥

१०. मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि
प्रथमान्यासन् ।
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति
देवाः ॥

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने । नमो वयं वैश्रवणाय
कुर्महे ।
स मे कामान्कामकामाय मह्यम् । कामेश्वरो वैश्रवणो
ददातु ।
कुबेराय वैश्रवणाय । महाराजाय नमः ॥

ॐ स्वस्ति । साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं
पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्यायी
स्यात्सार्वभौमः सार्वायुष आन्तादापरार्धात् । पृथिव्यै
समुद्रपर्यन्ताया एकराळिति ॥

तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो
मरुत्तस्यावसन्गृहे ।
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ॥

॥ श्री गणेशाय नमः । मंत्रपुष्पांजलिं समर्पयामि ॥